!! शिवतीर्थ !!
**शिक्षण विभाग प्राथमिक**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**
**पत्ता:- मुख्य इमारत,तिसरा मजला, अलिबाग, दुरध्वनी क्र. 02141-222369 फॅक्स नं. 02141-225114**
**ई-मेल: mdmraigad@gmail.com**

जा.क्रं.राजिप/प्राथ.शिक्षण/आस्था-23(अ)/RTE-मान्यता/2024 / 8025 दिनांक 20/12/2024

**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, ऑक्टोबर 11, 2011/आश्विन 19, शके 1933**

**नमुना दोन**

**प्रति,**

**मा.व्यवस्थापक/अध्यक्ष,**
**नवयुग विद्यापीठ ट्रस्ट**
**ता.महाड जि.रायगड**

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, 2011 यांच्या नियम 11, पोट-नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्या बाबत..**

**माननीय महादेय/महोदया,**

आपण केलेल्या दिनांक १९/०१/२०२३ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रायगड जिल्हा परिषद अलिबाग दिनांक १९/०१/२०२३ पासून दिनांक १८/०१/२०२६ तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ली ते इयत्ता ८ वी **नवयुग विद्यापीठ ट्रस्टचे, नवयुग इंग्लिश मिडियम स्कुल लाडवली ता.महाड जि.रायगड माध्यम -इंग्रजी या (शाळेचे नांव पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे. वरील मान्यता ही खालील अटी शर्तीच्या अधीन आहे :-**

1) मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही. आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2) बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

3) शाळा नजीकच्या दुर्बल, घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

4) परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5) संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

7) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही. किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतुन काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास,नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल
(सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की,अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/ तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील:
(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकविणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आ धारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

9) शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्या प्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.

10) शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये निर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.
मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - - - **१४८०० चौ. मीटर**
- एकूण बांधकाम क्षेत्र - - - **७०० चौ. मीटर**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - - - **५५०० चौ. मीटर**
- वर्गखोल्याची संख्या - - १२
- कार्यालय-नि-भंडार-नि-मुख्याध्यापकाची खोली आहे
- मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधगृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यादायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल होय
- पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर नाही
- अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता **आहे**
- वाचन साहित्य विनायासास उपलब्ध. आहे

11) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य í विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम, 1960 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

15) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.

16) तुमच्याशाळेला मिळालेला मान्यता संकेतांक RTE **- २७२४०४०४००५** असा आहे, हया कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

17) शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

आपली विश्वासू

(पुनिता गुरव)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
रायगड जिल्हा परिषद,अलिबाग

**Manager**
Navyug Vidyapeeth Trust
Ladvali - Mahad

NAVYUG ENGLISH MEDIUM SCHOOL
CBSE
AFF No
1130795
Ladvali, Tal. Mahad, Dist. Raigad

R. [signature]
**PRINCIPAL**
NAVYUG ENGLISH MEDIUM SCHOOL
LADVALI, TAL. MAHAD, DIST. RAIGAD